पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/५१५७२०/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- १७/११/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक २०/११/२०२३ रोजी ११.०० वा महालक्ष्मी लॉन्स, पुणे नगर रोड या ठिकाणी सकल मराठा समाज यांची सभा होणार असुन सभेकरीता श्री. मनोज जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत. सदर सभेकरीता अंदाजे दिड लाख नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सभेकरीता येणाऱ्या नागरीकांची वाहने एकाचवेळी नगर रोडवर येणार असल्याने संपुर्ण नगर रोडवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. तसेच दिपावली सणाच्या सुट्टया संपल्याने गावाहून परतणारे नागरीक (रिटर्नींग क्राऊड) यांच्या वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणार आहे त्यामुळे नगर रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने पिंपरी चिंचवड बाजूकडुन पुणे बाजूमार्गे नगररोडवर जाणारी जड अवजड वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी डॉ.शिवाजी पवार, पोलीस उप-आयुक्त, विषेश शाखा, पिंपरी चिंचवड, अति. कार्यभार, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### निगडी, तळवडे, भोसरी, चाकण वाहतुक विभाग अंतर्गत

- **पिंपरी चिंचवड बाजूकडून पुणे बाजूमार्गे नगररोडकडे जाण्यास सर्व प्रकारच्या जड/अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.**

➢ **पर्यायी मार्ग क्र:- १. जुना मुंबई पुणे हायवेवरून येणारी जड/अवजड वाहने भक्ती शक्ती चौक- मोशी टोल नाका- चाकण- शिक्रापुरमार्गे नगरकडे जातील.**

➢ **पर्यायी मार्ग क्र:- २. पिंपरी चिंचवड परिसरातील जड / अवजड वाहने नाशिकफाटा – भोसरी- चाकणमार्गे नगरकडे जातील.**

तरी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत वर नमुद केले प्रमाणे दि.२०/११/२०२३ रोजी सकाळी.०६/०० ते २४.०० वाजेपावेतो तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. पोलीस, ॲम्ब्युलन्स, फायरब्रिगेड, पेट्रोल, डिझेल टँकर, पीएमपीएमएल बसेस, स्कुल बस, वगळून) करण्यात येत असुन सदर वाहतूक बदलाची अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे तरी नागरीकांनी दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

Pawar
१७/११

(डॉ. शिवाजी पवार)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी **निगडी, तळवडे, भोसरी, चाकण** वाहतुक विभाग,

Scanned with CamScanner